# दिनांक 27/03/2025

**1** खालापूर पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 25/03/2025 रोजी 19:00 वा च्या सुमारास मौजे रानसई गावच्या हददीत गावदेवी मंदीराच्या पुढे खोपोली पेण रोडवर ता.खालापुर येथे डंपर क्रमांक.एम.एच.46 बी.बी.5226 वरील आरोपी चालक याने रिफलेक्टर किंवा इंडिकेटर न लावता धोकादायक पदधतीने रस्त्यावर उभा कररून फिर्यादी रा.वावोशी गोरठण बुदुक पो.वावोशी ता .खालापुर यांचा मावस भाउ याचे होंडा ड्रीम युगा कंपनीची मोटारसायकल -एम.एच.46 वाय 0358 ची सदर डंपरला पाठीमागुन ठोकर लागुन अपघात होवुन अपघातात मोटार सायकल स्वार यांचे मयत सौरभ विठठल कडु , वय-25 वर्ष रा.गागोदे बुदुक ता.खालापुर याचे कारणीभुत झाला तसेच डंपर चालक याने सदर बाबत पोलीसांना कोणत्याही प्रकारची माहीती न देता व त्यास कोणत्याही प्रकारची प्राथमिक उपचार न देता पळुन गेला.

याबाबत खालापूर पोलीस ठाणे गुरनं.105/2025, भा.न्याय.सं.2023 चे कलम 281, 106(1),285,सह मो.वा.का.कलम 134(अ), (ब) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई/श्री.अलोक खिसमतराव हे करीत आहेत.

**2**. महाड शहर पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 25/03/2025 रोजी 17:32 वा च्या सुमारास जामा मस्जिद लाडवली मोहल्ला, महाड येथे फिर्यादी रा.लाडवली मोहल्ला, महाड यांनी त्याची दोन्ही वाहने जामा मस्जिद समोरील शेतात पार्क करून ठेवल्या होत्या आरोपीत क्र.1 याने फिर्यादी यांस फोन करून मादरचोत तु नेहमी गाडया मध्ये लावतोस तुझा गाडया काढ आम्हाला क्रिकेट खेळायचे आहे असे बोलला त्यावेळी फिर्यादी त्यास म्हणाले की मी येवुन गाडया काढतो असे सांगीतले त्यानंतर फिर्यादी हे जामा मस्जिद येथे आले व त्यांचे पार्क करून ठेवलेला टाटा कंपनीचा ट्रक चालु होत नव्हता त्यावेळी त्याठिकाणी हजर असलेला आरोपीत क्र.02 याने फिर्यादी यांचा ट्रक निघाला नाही म्हणुन फिर्यादीस बॅटने मारहान केली व आरोपीत क्र.03 याने काठीने मारहान केली तसेच फिर्यादी यांचे आई जवळ येवुन म्हणाला की तुझा मुलगा याने शेतात पार्क केलेल्या गाडयामुळे आम्हाला क्रिकेट खेळता येत नाही त्याचेकडे पाहतो अशी दमदाटी केली.

याबाबत महाड शहर पोलीस ठाणे गुरनं.29/2025, भारतीय न्याय संहीता 2023 चे कलम 118(1),352,351(2),3(5)प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/पवार हे करीत आहेत.

**3.** नेरळ पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 25/03/2025 रोजी 12:25 वा च्या सुमारास मौजे भाउ साहेब विद्यामंदीर शाळेच्या जवळ डिकसळ,ता.कर्जत येथे महिला फिर्यादी रायगड हॉस्पीटल येथे पायी चालत जात असताना भाउ साहेब विद्यामंदीर शाळेच्या जवळ आलेवेळी आरोपीत रा. - ए-305,त्रिशुल गोल्डन व्हिले,सोनिवली गाव,बदलापुर वेस्ट, जि- ठाणे ता.कर्जत याने फिर्यादी यांचे जवळ गाडी थांबवुन खोपोलीला जाण्याचा रस्ता विचारण्याचे बहाण्याने फिर्यादी यांना हलवुन दाखवुन फिर्यादी यांचे स्त्री मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले. सदर गुह्यातील आरोपीस दिनांक 26/03/2025 रोजी 01:59 वा च्या सुमारास अटक करण्यात आली आहे.

याबाबत नेरळ पोलीस ठाणे गुरनं.53/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 79 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मपोसई/प्राची पांगे हे करीत आहेत.

**4**. रसायनी पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 25/03/2025 रोजी 19:30 वा च्या सुमारास मौजे गुळसुंदा डोंगर आदिवासीवाडी पनवेल येथे फिर्यादी रा.गुळसुंदा डोंगर आदिवासीवाडी पनवेल येथे आरोपीत क्र.01 यांना फिर्यादी यांच्या मुलीची वाडीमध्ये बदनामी का करता असे विचारण्यासाठी गेले असता आरोपी क्र.2 व 3 यांनी फिर्यादी यांना शिविगाळी केली व आरोपी क्र.01 यांनी लाकडी बॅट फिर्यादी यांचे डोक्यात मारुन दुखापत केली.

याबाबत रसायनी पोलीस ठाणे गुरनं.68/2025, बी.एन.एस.118(1),352,3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/चौरे हे करीत आहेत.

**5**. खोपोली पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 13/03/2025 रोजी 16:15 वा च्या सुमारास मौजे फुडमॉंल येथील हॉंटेल समोर खोपोली, येथे, खालापुर आरोपीत रा.तरडगाव,पो.जामखेड, ता.सोनगाव, जि.अहमदनगर यांने ताच्या ताब्यातील शिवनेरी बस क्र. एमएच- 01 ईई 5357 ही अतिवेगाने, हयगयीने, अविचाराने, एस.टी.बस चालवुन महिला फिर्यादी यांचे वडील शंकर गणपत जरांडे, वय-67 वर्षे, रा.सध्या मातोश्री सेक्टर नं.05, श्रीनगर, वाघळे इस्टेड, ठाणे वेस्ट, मुळ.रा.मु.आसरे, पो.कोरेगाव, ता.कोरेगाव, जि.सातारा यांस ठोकर मारून अपघात करून त्यांचे डाव्या पायास गंभीर दुखापत केली.

याबाबत खोपोली पोलीस ठाणे गुरनं.90/2025, भारतीय न्याय संहिता- 2023 चे कलम 281,125(अ),125(ब) व मो.वा.का.क.184 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मपोह/सावंत ह्या करीत आहेत.

**6.** पोलादपूर पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 25/03/2025 रोजी 19:00 वा ते दि.26/03/2025 रोजी 19:00 वा च्या दरम्यान मौजे ओंबळी गावचे जंगलमय भागात पोलादपूर ता.पोलादपूर येथे आरोपीत नं.01 ते 04 यांनी फिर्यादी रा.घेरारसाळगड गवळवाडी, खेड, रत्नागिरी व साक्षीदार यांचे मालकीचे बैल जंगलात चरण्यासाठी सोडले असताना 04 आरोपित यांनी फिर्यादी व साक्षीदार यांचे संमतीशिवाय स्वत:चे फायदयाकरीता लबाडीच्या हेतूने बैल चोरून नेले. सदर गुन्ह्यातील 04 आरोपी यांना दिनांक 26/03/2025 रोजी 22:50 वा च्या सुमारास अटक करण्यात आली आहे.

याबाबत पोलादपूर पोलीस ठाणे गुरनं.19/2025, भा.न्या.सं.303(2),3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/सुतार हे करीत आहेत.

**7**. पाली पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 25/03/2025 रोजी 17:00 वा ते दि. 26/03/2025 रोजी 17:00 वा च्या दरम्यान मौजे घेरा सुधागड ठाणाळे ता.सुधागड येथे फिर्यादी रा.सेक्टर 16 प्लॉट नं 39 कळंबोली , पनवेल यांचे फार्महाउस येथे फिर्यादी यांच्या वरील एकूण 63,500/-रुपये किंमतीच्या वस्तु अज्ञात ईसमाने स्वःच्या फायदया करीता लबाडीच्या हेतूने फार्महाउसचे खीडकीला असलेली स्टील चे वरील काढुन खीडकीची जाळी फाडुन त्यावाटे फार्महाउस मंध्ये प्रवेश करून चोरी केली आहे.

याबाबत पाली पोलीस ठाणे गुरनं.31/2025, भा-न्या-सं-2023 चे कलम 305,331 (3),331(4) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/ढूमने हे करीत आहेत.

**8.** खोपोली पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 16/03/2025 रोजी 11:30 वा ते दि. 22/03/2025 रोजी 11:30 वा च्या दरम्यान मौजे गम प्रो कंपनी ढेकु साजगाव खोपोली, ता.खालापुर येथे कोणीतरी अज्ञात चोरटयाने किंवा चोरटयांनी, वर नमुद कंपनीचे प्लॉट नं.201 मध्ये कंपनीचे ठेवलेल्या साहित्यापैकी, 3,22,000/-रुपये किमतीचा मालाचे, फिर्यादी रा.802, सरयु अपार्टमेंट, निळकंठ व्हॅली, फेज-2, सिध्दार्थनगर, खोपोली, ता.खालापुर, किंवा कंपनीचे व्यवस्थापनाचे परवानगी शिवाय, लबाडीच्या हेतुने, स्वत:चे आर्थिक फायदयाकरीता चोरी करुन नेला

याबाबत खोपोली पोलीस ठाणे गुरनं.91/2025, भारतीय न्याय संहिता कायदा 2023 चे कलम 303(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/कुंभार हे करीत आहेत.

**9.** रोहा पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 26/03/2025 रोजी 18:30 वा च्या सुमारास मौजे चैतन्य अपार्टमेंट आदर्शनगर पो. वरसे, ता.रोहा येथे कोणीतरी अज्ञात चोरटयांनी फिर्यादी रा. चैतन्य अपार्टमेंट आदर्शनगर पो. वरसे ता.रोहा यांचे बंद घराचे व शेजारील इतर घरांचे कडी कोयंडा तसेच लॉक कोणत्यातरी साधनाने तोडुन उपकुन त्यावाटे घरात प्रवेश करून सामान अस्थाव्यस्त करून एकूण 6,16,000/-रुपये कीमतीचा माल स्वत:च्या फायदया करिता लबाडीच्या हेतुने घरफोडी चोरी करून नेला.

याबाबत रोहा पोलीस ठाणे गुरनं.62/2025, भारतीय न्याय संहिता कलम 305,331 (3), 62 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सपोनि/श्री.रावडे हे करीत आहेत.

## वाहतूक केसेस

दिनांक 26.03.2025 रोजी 28 पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी वाहतुकीचे नियम भंग करणा-या एकूण 185 इसमावर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून 1,92,450/-रुपये इतका दंड आकारला आहे.